K.M. KADEGAON LIBRARY

**SB - 27**

Total No. of Pages : 2

| Seat No. | |
|---|---|

# M.A. (Part - II) (Semester - IV) (New) (CBCS) Examination, March - 2023
## MARATHI (मराठी)
## समाजभाषाविज्ञान (अभ्यासपत्रिका क्र. –13)
## Sub. Code : 61565/72516

Day and Date : Monday, 12 - 06 - 2023 Total Marks : 80

Time : 10.30 a.m. to 01.30 p.m.

**सूचना :**
1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.
2) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.1)** योग्य पर्याय निवडा : [10]

i) भाषेच्या सामाजिक दृष्टीकोनातून केलेल्या अभ्यासातून कोणती स्वतंत्र अभ्यास शाखा निर्माण झाली?

अ) मानववंशशास्त्र ब) अर्थविज्ञान

क) समाजशास्त्र ड) समाजभाषाविज्ञान

ii) भाषाविज्ञानाचा सर्वात प्रगत टप्पा म्हणून कोणते अध्ययनक्षेत्र ओळखले जाते?

अ) शैलीविज्ञान ब) समाजभाषाविज्ञान

क) अर्थविज्ञान ड) मनोविज्ञान

iii) भाषेवरून भाषिक समाज ठरवणे व समाजावरून भाषा ठरविणे यात गोलगोल फिरण्याचा दोष आहे, हे मत कोणोचे?

अ) रमेश वरखेडे ब) मंगला वरखेडे

क) रमेश धोंगडे ड) दिलीप धोंगडे

iv) मानववंशशास्त्राच्या प्रमुख दोन शाखा असून एक सामाजिक व सांस्कृतिक मानवशास्त्र आहे, तर दुसरी कोणती?

अ) शारीरिक मानवशास्त्र ब) मानसशास्त्र

क) नीतिशास्त्र ड) ध्वनिशास्त्र

v) क्षेत्रीय सर्वेक्षणाच्या आधारे भाषा बदलांचा नकाशा तयार करण्याचे काम कोणत्या अभ्यास शाखेत केला जातो?

अ) बोलीविज्ञान ब) मानववंशशास्त्र

क) समाजशास्त्र ड) मानसशास्त्र

*P.T.O.*

vi) समाजभाषाविज्ञानातील 'भाषिक भांडार' ही संकल्पना कोणी मांडली?

अ) जॉन गम्पर्झ | ब) हडसन
क) जॉन लेओन | ड) श्लेगेल

vii) स्वत:ची भाषा टिकवून ठेवण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात?

अ) भाषात्याग | ब) भाषाद्वित्व
क) भाषाजतन | ड) भाषावैभव

viii) भाषा – नियोजनात कोणत्या विचारांना महत्त्वाचे स्थान असले पाहिजे?

अ) राजकीय विचारांना | ब) शिक्षणविषयक विचारांना
क) माध्यमांच्या निवडीला | ड) धर्मभावनेला

ix) सामाजिक बोलीविज्ञानाचा प्रारंभ कोणत्या भाषाभ्यासकांनी केला?

अ) विल्यम लेबॉव | ब) विल्यम जोन्स
क) व्हिटनी | ड) येस्परसन

x) 'खल्लेकडच्या खल्लेकडेच गेल्लो' हे वाक्य कोणत्या बोलीतील आहे?

अ) अहिराणी | ब) वऱ्हाडी
क) कोकणी | ड) चंदगडी

**प्र.2)** समाजात भाषाव्यवहार आणि भाषासंपर्क कसा होतो? ते लिहा. [20]

किंवा

भाषानियोजनात भाषाशिक्षणाचे योगदान कितपत आहे, ते स्पष्ट करा.

**प्र.3)** समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्राचा समाजभाषाविज्ञानाशी असलेला सहसंबंध स्पष्ट करा. [20]

किंवा

बोलीच्या निर्मितीची कारणे व विशेष सविस्तर स्पष्ट करा.

**प्र.4)** थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन) [30]

अ) शेजार भाषा आणि परभाषा संपर्क यातील फरक स्पष्ट करा.
ब) स्वभाषा शिक्षणाचे माध्यम का असावे?
क) समाजभाषाविज्ञानास भाषेचे समाजशास्त्र असे का म्हणतात?
ड) बोली भूगोलाची संकल्पना स्पष्ट करा.
इ) 'भाषा जतन' ही संकल्पना स्पष्ट करा.

| Seat No. | |
|---|---|

**M.A. (Part - II) (Semester - IV) (New) (CBCS) Examination, March - 2023**

# MARATHI (मराठी)

## मराठी समीक्षेची: वाटचाल (Paper - XV)

**Sub. Code : 61566/72517**

Day and Date : Tuesday, 13 - 06 - 2023
Time : 10.30 a.m. to 1.30 p.m.

Total Marks : 80

सूचना : 1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.
2) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.1)** योग्य पर्याय निवडा : [10]

i) का. बा. मराठे यांनी कादंबरी आणि नाटक यांची चर्चा कोणत्या निबंधात केली आहे?

अ) नावल व नाटक ब) संस्कृत कविपंचक

क) मराठी गद्याचा इंग्रजी अवतार ड) शब्दसिद्धी निबंध

ii) 'अद्भुत व वास्तव' यामध्येच कादंबरीचे सामर्थ्य दडलेले आहे, असे कोणी म्हटले आहे?

अ) का.बा. मराठे ब) वि. का. राजवाडे

क) विष्णुशास्त्री चिपळूणकर ड) रा.भि. गुंजीकर

iii) कोणाच्या राजवटीने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला आधुनिकतेचे नवे वळण लागले?

अ) ब्रिटीश ब) मुघल

क) डच ड) मराठे

iv) 'सविकल्प समाधी' हा साहित्य सिद्धांत कोणी मांडला आहे?

अ) न. चिं. केळकर ब) वि. का. राजवाडे

क) का. बा. मराठे ड) कृष्णशास्त्री चिपळूणकर

v) मराठीत सौंदर्यात्मक समीक्षेचा पाया कोणी घातला?

अ) बा. सी. मर्ढेकर ब) लालजी पेंडसे

क) वि. का. राजवाडे ड) भालचंद्र नेमाडे

vi) 'ललित लेखक कलेचा उपासक आहे, शंकराचार्याचा चोपदार नाही' हे विधान कोणी केले आहे?

अ) न. चिं. केळकर ब) यशवंत मनोहर

क) भालचंद्र फडके ड) ना. सी. फडके

vii) आपल्या समीक्षेतून 'करूणरसांची मीमांसा' कोणी केली आहे?

अ) दि. के. बेडेकर — ब) रा. भा. पाटणकर

क) पु. भा. भावे — ड) ह. ना. आपटे

viii) 'देशीवादाचा सिद्धांत' मराठी समीक्षेत कोणी मांडला आहे?

अ) ना. सी. फडके — ब) ल. रा. पांगारकर

क) भालचंद्र नेमाडे — ड) कुसुमावती देशपांडे

ix) मराठी समीक्षेचे पुढीलपैकी कोणते दोन मुख्य प्रकार आहेत?

अ) आस्वादक आणि टीका — ब) तात्त्विक व उपयोजित

क) सौंदर्यात्मक व भावनात्मक — ड) यापैकी नाही

x) संत काव्याच्या आधारे मराठीचे स्वतंत्र साहित्यशास्त्र कोणी मांडले?

अ) गो. मा. पवार — ब) गंगाधर गाडगीळ

क) मा. गो. देशमुख — ड) वसंत पाटणकर

**प्र.2)** एकोणिसाव्या शतकातील नियतकालिकातून आलेला समीक्षाविचार स्पष्ट करा. [20]

किंवा

स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील प्रमुख मराठी समीक्षकांच्या कामगिरीचा आढावा घ्या.

**प्र.3)** स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेतील मर्ढेकरांच्या समीक्षीचे योगदान स्पष्ट करा. [20]

किंवा

मराठी समीक्षेचे स्वरूप सांगून तिच्या वाटचालीतील प्रमुख टप्पे स्पष्ट करा.

**प्र.4)** लघुत्तरी प्रश्न. (पाचपैकी तीन) [30]

अ) निबंधमालेतील समीक्षाविचार थोडक्यात लिहा.

ब) वा. ब. पटवर्धन यांचे समीक्षाविषयक कार्य स्पष्ट करा.

क) बा. सी. मर्ढेकर यांचा लयसिद्धांत स्पष्ट करा.

ड) शरचंद्र मुक्तिबोध यांचा 'मानुषतेचा सिद्धांत' विषद करा.

इ) भालचंद्र नेमाडे यांचा देशीवाद थोडक्यात लिहा.

| Seat No. | |
|---|---|

# M.A. (Part - II) (Semester - IV) (New) (CBCS) Examination, March - 2023

## MARATHI (मराठी)

## वाङ्मयीन संस्कृती (Paper - 14.1)

## Sub. Code : 61567/72518

**Day and Date : Wednesday, 14 - 06 - 2023** **Total Marks : 80**

**Time : 10.30 a.m. to 1.30 p.m.**

**सूचना :** 1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

2) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.1)** योग्य पर्याय निवडा : **[10]**

i) अभिरूची ही खालीलपैकी कोणत्या शक्तीहून भिन्न असते?

अ) रूप ब) प्रतिभा

क) इच्छा ड) स्वरूप

ii) बखर, पोवाडे, लावणी यांचा एक नवा, प्रवाह वाङ्मयीन परंपरेत कोणत्या काळापासून निर्माण झाला?

अ) बहामणी काळ ब) शिवकाळ

क) पेशवेकाळ ड) अव्वल इंग्रजी काळ

iii) 'घाशीराम कोतवाल' हे नाटक कोणत्या नाटककाराने लिहिले आहे?

अ) महेश एलकुंचवार ब) विजय तेंडूलकर

क) दत्ता भगत ड) प्र. के अत्रे

iv) श्लिल व अश्लिल या दोन्ही संकल्पना कोणत्या शास्त्राशी जोडलेल्या आहेत?

अ) कल्पना व विचार ब) मन व बुद्धी

क) मानवी भावना व नितीशास्त्र ड) यापैकी नाही

v) मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया कोणी रचला?

अ) बाळशास्त्री जांभेकर ब) बापू छत्रे

क) दादोबा तर्खडकर ड) लोकहितवादी

vi) सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर, मोकळ्या पटांगणात सादर केल्या जाणाऱ्या नाट्य प्रकारास काय म्हणतात?

अ) श्रुतिका ब) नाटक

क) एकांकिका ड) पथनाट्य

vii) 'सत्यशोधकी जलसे' कोणत्या उद्देशाने सुरू झाले होते?

अ) सामाजिक प्रबोधन
ब) विनोद
क) तत्वज्ञान
ड) मनोरंजन

viii) 'आंबेडकरी जलसे' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

अ) रामशेठ ठाकूर
ब) भगवान ठाकूर
क) रवींद्र ठाकूर
ड) विश्वनाथ शिंदे

ix) पहिले साहित्य संमेलन कोणत्या नावाने भरले होते?

अ) साहित्य संमेलन
ब) मराठी ग्रंथकारांचे संमेलन
क) मराठी साहित्य संमेलन
ड) यापैकी नाही

x) डॉ. एस. आर. रंगनाथन यांना खालीलपैकी कशाचे जनक मानले जाते?

अ) ज्ञानाचे
ब) भारतीय ग्रंथालय शास्त्राचे
क) भारतीय स्वातंत्र्याचे
ड) विज्ञानाचे

**प्र.2)** अंतर्गत विकल्पासह दीर्घोत्तरी प्रश्न. [20]

साहित्य संमेलनाची व्याख्या सांगून साहित्य संमेलनाचा उद्देश स्पष्ट करा.

किंवा

साहित्य संमेलनाची पार्श्वभूमी स्पष्ट करून मराठी साहित्य संमेलनातील परिवर्तन सविस्तर सांगा.

**प्र.3)** अंतर्गत विकल्पासह दीर्घोत्तरी प्रश्न. [20]

वाङ्मयीन संस्कृतीची संकल्पना स्पष्ट करून वाङ्मयीन संस्कृतीचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

आधुनिक कालखंडात मराठी वाङ्मयीन संस्कृतीच्या जडणघडणीत कारणीभूत ठरलेल्या घटकांची सविस्तर चर्चा करा.

**प्र.3)** लघुत्तरी प्रश्न. (पाचपैकी तीन सोडवा) [30]

अ) साहित्य संमेलनाचे योगदान स्पष्ट करा.

ब) वाङ्मयबाह्य घटकांचा साहित्य संमेलनावर होणारा परिणाम स्पष्ट करा.

क) समाज आणि साहित्य परस्पर संबंध स्पष्ट करा.

ड) 'माझी मैना गावावर राहिली' या अण्णाभाऊ साठे यांच्या लावणीचे स्वरूप सांगा.

इ) शुद्ध-अशुद्धतेच्या कल्पना स्पष्ट करा.

| Seat No. | |
|---|---|

# M.A. (Part - II) (Semester - IV) (CBCS-CR) Examination, March - 2023

# MARATHI (मराठी)

## बोली अभ्यास (Paper - 16.3)

## Sub. Code : 61508/72522

Day and Date : Thursday, 15 - 06 - 2023 Total Marks : 80

Time : 10.30 a.m. to 01.30 p.m.

**सूचना :** 1) सर्व प्रश्न अनिवार्य.

2) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.1)** योग्य पर्याय निवडा. [10]

i) स्वन म्हणजे काय?

अ) भाषेत वापरला जाणारा मूल ध्वनी ब) व्याकरण

क) धातू ड) शब्दसंग्रह

ii) संरचनाविचारात शब्दांची क्रमवार रचना म्हणजे काय?

अ) श्रृंखला ब) स्वनिक परिसर

क) साधर्म्य ड) वैधर्म्य

iii) बोलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य कोणते?

अ) उच्चारण ब) संकलन

क) विश्लेषण ड) क्रियापदे

iv) बोलींच्या शब्द संग्रहाने प्रमाण मराठीचा शब्दनिधी वाढेल, असा समज भाषाविषय 'अज्ञानाचे गमक आहे' असे मत कोणत्या भाषाभ्यासकाचे आहे?

अ) रमेश धोंगडे ब) रमेश वरखेडे

क) मिलिंद मालशे ड) अशोक केळकर

v) बोलीच्या समाज भाषा वैज्ञानिक अभ्यासात 'भाषिक व्यवहार आणि परिस्थितीचा संदर्भ' ही संकल्पना कोणत्या भाषाभ्यासकाच्या अभ्यासातून पुढे आली?

अ) जॉर्ज ग्रिअर्सन ब) विल्यम लेबॉव

क) मॅलिनोवस्की ड) एडवर्ड सपिर

vi) समाज भाषा विज्ञाना मध्ये भाषेचा अभ्यास कोणत्या भेदांना समोर ठेवून केला जातो?

अ) आर्थिक  ब) वैयक्तिक

क) मानसिक  ड) सामाजिक

vii) एखादा भाषेची क्षेत्रमर्यादा सांगणे, कठीण का असते?

अ) बोलीचा इतिहास अडथळा ठरतो

ब) बोलीचे नकाशे माहीत नसतात

क) एखादी बोली दुसऱ्या बोलीत अदृश्यरीत्या अंतर्भूत होते

ड) बोलीची टक्केवारी ठरलेली नसते

viii) मराठी भाषेत स्थिर झालेले इंग्रजी, हिंदी, फार्सी शब्द समजून घेण्यासाठी कोणती पार्श्वभूमी महत्त्वाची ठरते?

अ) पौराणिक  ब) ऐतिहासिक

क) भौगोलिक  ड) प्रादेशिक

ix) बोलींचा क्षेत्रीय अभ्यास म्हणजे काय?

अ) ऐकीव माहितीवर अभ्यास करणे

ब) पर्यटन स्थळांना भेटी देणे

क) तीर्थक्षेत्रांना जाणे

ड) विशिष्ठ ठिकाणी जाऊन बोलींचे संकलन करणे

x) बोलीचे विश्लेषण कशावर अवलंबून असते?

अ) क्षेत्रावर  ब) प्रदेशावर

क) संकलनावर  ड) निवेदकावर

प्र.2) स्वन–स्वनिम–स्वनांतर ही प्रक्रिया बोलींच्या आधारे स्पष्ट करा. [20]

किंवा

समाज भाषा वैज्ञानिक दृष्टिकोनातून बोलींचा अभ्यास कसा करता येतो, ते लिहा.

प्र.3) 'बोली भूगोल' संकल्पना स्पष्ट करून भाषिक प्रदेशाची ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमी स्पष्ट करा. [20]

किंवा

क्षेत्रिय अभ्यास पद्धतीनुसार कोल्हापुरी बोलीचा अभ्यास करण्याचे टप्पे लिहा.

प्र.4) थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : [30]

अ) बोलीचा रूपिमविचार लिहा.

ब) बोलीचे संकलन आणि विश्लेषण करण्याची पद्धत लिहा.

क) बोली अभ्यासाचा पारंपरिक दृष्टीकोन कसा होता? ते लिहा.

ड) विविध व्यावसायिकांच्या बोलीतील भिन्नता स्पष्ट करा.

इ) कोल्हापूर बोलीचे वेगळेपण लिहा.

⌘⌘⌘